जनसंपर्क कक्ष
2 2 MAY 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण प्रसारासाठी समन्वयकांनी पुढाकार घ्या

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

दूरशिक्षणाची संकल्पना समाजातील सर्व घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अभ्यास केंद्र समन्वयकांनी सक्रिय पुढाकार घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील ८९ अभ्यासकेंद्रांतील समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश प्रक्रियेबाबत झालेल्या ऑनलाइन



**कोल्हापूर : कार्यशाळेत ऑनलाईन मार्गदर्शन करताना डॉ. कृष्णा पाटील.**

कार्यशाळेत ते बोलत होते.


कार्यशाळेत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. तसेच ऑनलाइन एम.बी.ए., एम.एस्सी. (गणित) व एम.कॉम. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यशाळेस उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, सहायक कुलसचिव दिलीप मोहाडीकर आदी उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, शिक्षण अपूर्ण राहिलेल्या तसेच नोकरी करत असलेल्या व्यक्तींना दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाची मोठी संधी उपलब्ध होत आहे.

डॉ. प्रवीण लोंढे, डॉ. प्रसाद दावणे तसेच संतोष देवेकर यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी आभार मानले.

2 2 MAY 2026
पुढारी

संक्षिप्त



कोल्हापूर : दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ घेताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. कबीर खराडे आदी.

## विद्यापीठात दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी व अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचवणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे तसेच भावी पिढीच्या मनात देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रति जागरूकता निर्माण करणे असा यामागील हेतू आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, वसंत एकले, सुजित मुंढे उपस्थित होते.

22 MAY 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात हिंसाचारविरोधी दिन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचवणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे, तसेच भावी पिढीच्या मनात देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रती जागरूकता निर्माण करणे असा यामागील हेतू आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, वसंत एकले, सुजित मुंढे, संदीप हेगडे, सुजित सकटे, सैफ सज्जन, अनिकेत पाटील, जुबेर पठाण आदी उपस्थित होते.

2 2 MAY 2026

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ ग्रहण करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. कबीर खराडे आदी.

# दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिन शिवाजी विद्यापीठात साजरा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळला. दहशतवाद व हिंसाचारविरोधी पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी. अहिंसेचा संदेश पोहोचवणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे. तसेच भावी पिढीच्या मनात देशाच्या प्रगतीसाठी व संरक्षणाप्रति जागरूकता निर्माण करणे, असा यामागील हेतू आहे. मुख्य इमारतीमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, सुरेश बंडगर, वसंत एकले, सुजित मुंढे, संदीप हेगडे, सुजित सकटे, सैफ सज्जन, अनिकेत पाटील, जुबेर पठाण, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

22 MAY 2026

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. राजनीश कामत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रंगतदार ठरलेल्या पाच जणांच्या कुलगुरूपदाच्या स्पर्धेत डॉ. राजनीश कमलाकर कामत यांनी बाजी मारली. राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी गुरुवारी ही घोषणा केली.

शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, नागपूर येथील डॉ. स्मिता देशमुख व पुणे विद्यापीठाचे डॉ. संजय ढोले यांनी मुलाखती दिल्या होत्या. सध्या ते मुंबई येथील डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू असून, त्यांच्याकडेच लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे.

22 MAY 2026 **पुढारी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी ते कुलगुरू; डॉ. कामत यांचा प्रवास

## आठ महिन्यांनंतर नियुक्ती; कोल्हापूरच्या सुपुत्रास दुसऱ्यांदा संधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठास तब्बल आठ महिन्यांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर डॉ. आर. के. कामत यांच्या रूपाने नवीन कुलगुरू मिळाले आहेत. डॉ. कामत यांचा विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक ते कुलगुरू असा थक्क करणारा प्रवास राहिला आहे. डॉ. डी. टी. शिर्के यांच्यानंतर सलग दुसऱ्यांदा कोल्हापूरच्या सुपुत्रास कुलगुरुपदाची संधी मिळाली आहे.

डॉ. कामत यांचे मूळ गाव कागल असून, त्यांचा जन्म मिरज (जि. सांगली) येथे झाला. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. गोवा विद्यापीठातून पीएच.डी. पूर्ण केली. त्यांच्याकडे २८ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, यंत्रशिक्षण व सायबर-भौतिक प्रणाली क्षेत्रात उल्लेखनीय संशोधन केले आहे. त्यांनी २३ हून अधिक अभ्यासक्रम विकसित केले आहेत. त्यांच्या नावावर अनेक पेटंट, आंतरराष्ट्रीय पुस्तके व संशोधन प्रकल्प आहेत. डॉ. होमी भाभा राज्य समूह विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू म्हणून कार्यरत होते. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे प्रभारी कुलगुरू म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. त्यांना विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविले आहे.

### कोल्हापूरच्या सामाजिक-शैक्षणिक परंपरेशी निगडीत

डॉ. कामत यांचे कुटुंब करवीर संस्थान व कोल्हापूरच्या सामाजिक-शैक्षणिक परंपरेशी निगडीत आहे. त्यांचे आजोबा छत्रपती राजाराम महाराजांचे खासगी वैद्य होते. त्यांचे काका डॉ. बाळकृष्ण कामत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्नेही होते. डॉ. आंबेडकर यांनी कागल येथे त्यांच्या घरी मुक्काम केला होता. त्यांचे वडील कोल्हापूर गुन्हे अन्वेषण विभागात उपअधीक्षक पदावर कार्यरत होते.



# आर. के. कामत शिवाजी विद्यापीठाचे १४ वे कुलगुरू

(पान १ वरून)

यांनी कागल येथे त्यांच्या घरी मुक्काम केला होता. त्यांचे वडील कोल्हापूर गुन्हे अन्वेषण विभागात उपअधीक्षक होते.

मूळचे कागल येथील सोमवार पेठेत राहणारे डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात एम.एससी. तसेच गोवा विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली आहे. विद्यापीठात ते इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. गेल्या २५ वर्षांत त्यांनी शिवाजी विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माध्यमातून उच्च शिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इनक्युबेशन लिन्केजिसचे संचालक, तंत्रज्ञान विभागाचे संचालक, इलेक्ट्रॉनिक्स तसेच संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख, बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करिअर कौन्सिलिंग कक्षाचे समन्वयक पदांचा समावेश आहे. ३ ऑगस्ट २०२३ रोजी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होण्याचा बहुमान त्यांना मिळाला होता.

## कशामुळे मिळाली संधी..

१. डॉ. कामत प्रदीर्घ काळ अध्यापन क्षेत्रात सक्रिय. त्यांच्या विषयाच्या क्षेत्रात अभ्यासू, संशोधक आणि तज्ज्ञ म्हणून मान्यता. विवेकानंद महाविद्यालयातही त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स डिपार्टमेंटमध्ये काम करताना आपल्या कामाची चुणूक दाखवली.

२. शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स डिपार्टमेंटमध्ये त्यांनी अध्यापन, संशोधन करताना, या विषयातील वैविध्यपूर्ण असे लेखन केले. त्याअनुषंगाने त्यांची पुस्तके प्रकाशित, ज्यांना राष्ट्रीयस्तरावरही मान्यता.

३. अलिकडेच त्यांना डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम करण्याची संधी मिळाली. याठिकाणी काम करतानाही, त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला.

४. नवीन शैक्षणिक धोरण आणि त्यासंदर्भाने स्थापन केलेल्या समन्वय समितीवरही त्यांनी उत्कृष्ट काम केले. जयपूर सेंट्रल युनिव्हर्सिटीच्या उभारणीतही अभ्यास मंडळ सदस्य म्हणून उठावदार काम केले आहे.

५. स्वच्छ चारित्र्य, आंतरराष्ट्रीय दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता, सर्वांना सोबत घेऊन काम करणारी व्यक्ती अशी ओळख

2 2 MAY 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. आर. के. कामत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी प्रा. डॉ. राजनीश कमलाकर (आर.के.) कामत यांची निवड गुरुवारी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी ही घोषणा केली. आदेशाची प्रत सायंकाळी विद्यापीठ कार्यालयास प्राप्त झाली. डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाचे १४ वे कुलगुरू ठरले आहेत. शुक्रवारी ते पदभार स्वीकारणार आहेत.

डॉ. डी. टी. शिर्के यांच्यानंतर सलग दुसऱ्यांदा शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकाकडे कुलगुरुपदाचा पदभार आला आहे. डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाच्या



इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे माजी प्रमुख असून, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. सध्या ते मुंबई येथील डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे.

> गेल्या तीन पिढ्यांपासून कोल्हापूरशी नाळ जुळलेली आहे. शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी ते कुलगुरू असा प्रवास राहिला आहे. त्यामुळे प्रामाणिक काम करणार आहे. विद्यापीठात सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील क्षमता विकसित करणे, त्यांना रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, यासाठी प्रयत्न राहील. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट व तंत्रज्ञान विद्यापीठातील अनुभवाचा चांगल्या गोष्टी सुरू करण्यासाठी उपयोग करणार आहे.
>
> **- डॉ. आर. के. कामत,**
> नूतन कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
22 MAY 2026 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आर. के. कामत शिवाजी विद्यापीठाचे १४ वे कुलगुरू

## विद्यापीठाचा विद्यार्थीच बनला कुलगुरू : आज पदभार स्वीकारणार

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू आणि शिवाजी विद्यापीठाचेच विद्यार्थी असलेले रजनीश कमलाकर ऊर्फ डॉ. आर. के. कामत यांची गुरुवारी निवड करण्यात आली. ही नियुक्ती पाच वर्षांच्या कार्यकाळासाठी किंवा ते वयाची पासष्ट वर्षे पूर्ण करतील, यापैकी जी तारीख अगोदर असेल त्या तारखेपर्यंत असेल.

राज्यपाल तथा कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी या निवडीची घोषणा केली. कुलगुरूपदासाठी राजभवन येथे १४ मे रोजी पाचजणांच्या मुलाखती झाल्या होत्या. या मुलाखती प्रक्रियेनंतर कुलपती कार्यालयाकडून डॉ. कामत यांची निवड जाहीर केली. डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाचे चौदावे कुलगुरू ठरले आहेत. आज, शुक्रवारी ते पदभार स्वीकारणार आहेत.

विद्यापीठाचे कुलगुरुपद गेली नऊ महिने रिक्त होते. डी. टी. शिर्के यांचा कुलगुरु पदाचा कालावधी सहा ऑक्टोबर २०२५ ला संपला. त्यानंतर कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे होता. डॉ. कामत यांच्याकडे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे.

कामत यांचे मूळ गाव कागल असून त्यांचा जन्म मिरज (जि. सांगली) येथे झाला. त्यांचे कुटुंब करवीर संस्थान आणि कोल्हापूरच्या सामाजिक-शैक्षणिक परंपरेशी निगडित आहे. त्यांचे आजोबा छत्रपती राजाराम महाराजांचे खासगी वैद्य होते. त्यांचे काका डॉ. बाळकृष्ण कामत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्नेही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर (पान ६ वर)

### हे पाचजण होते स्पर्धेत..

कुलपती कार्यालयाकडून कुलगुरूपदाच्या अंतिम मुलाखतीसाठी शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, नागपूर विद्यापीठातील डॉ. स्मिता देशमुख आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. संजय ढोले यांच्या मुलाखती झाल्या होत्या.

❝

शिवाजी विद्यापीठात माझे संपूर्ण शिक्षण झाले. तिथेच प्राध्यापक झालो. याच विद्यापीठाने संशोधक म्हणून मला ओळख दिली. प्रशासकीय काम करण्याची संधी दिली. ज्या विद्यापीठात शिक्षण घेतले त्याच विद्यापीठात कुलगुरू म्हणून जाणे माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. मी या विद्यापीठाचे काहीतरी देणे लागतो म्हणून नियतीने माझी निवड केली असावी, अशी माझी भावना आहे.

**डॉ. आर. के. कामत, नूतन कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

### १६ पुस्तकांचे लेखन

डॉ. कामत यांना अध्यापन, संशोधन व प्रशासनाचा व्यापक अनुभव आहे. डॉ. कामत यांच्या २११ संशोधन पत्रिका आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाल्या असून त्यांची १६ पुस्तकेदेखील प्रकाशित झाली आहेत.

22 MAY 2026

Times of India

# Dr Kamat new VC of Shivaji University, Kolhapur

Rahul.Gayakwad
@timesofindia.com

**Kolhapur:** Dr Rajanish Kamat was on Thursday appointed the vice-chancellor of Shivaji University, Kolhapur.



Dr Kamat becomes the 14th VC of university. He will serve a five-year term or until he attains the age of 65, whichever comes earlier. A native of Kagal in Kolhapur district, Dr Kamat holds an MSc in Electronics from Shivaji University and a PhD from Goa University. He has also undergone advanced technical training at the Indian Institute of Science (Bengaluru) and IIT (Kanpur).

Speaking about his appointment, Dr Kamat said it was an "unforgettable moment" to lead the university that shaped his life. "My priorities would include strengthening research, introducing new courses and ensuring better placement opportunities, with the aim of elevating the university's national and global standing," he said.

2 2 MAY 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्याकडून घोषणा : आज स्वीकारणार कार्यभार

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. कामत

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजनीश कमलाकर कामत यांची यांची निवड करण्यात आली आहे. राज्यपाल तथा कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. तब्बल नऊ महिन्याच्या कालावधीनंतर विद्यापीठाला पूर्णवेळ नवे कुलगुरू मिळणार आहेत.

डॉ. राजनीश कामत हे शिवाजी विद्यापीठाचे १४ वे कुलगुरु ठरले आहेत. त्यांच्या निवडीच्या आदेशाची प्रत गुरूवारी सायंकाळी विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाली.



डॉ. दिगंबर शिर्के यांच्यानंतर सलग दुसऱ्यांदा शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकाकडेच कुलगुरू पदाचा पदभार आला आहे. आज सकाळी साडेदहा वाजता ते कार्यभार स्वीकारणार आहेत.

डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे माजी प्रमुख असून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी काम पाहिलेले आहे. सध्या ते मुंबई येथील डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे.

**२११ संशोधन पत्रिका,**

**१६ पुस्तके प्रकाशित**

डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात एम.एससी. तसेच गोवा विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली असून त्यांना अध्यापन, संशोधन व प्रशासनाचा व्यापक अनुभव आहे.

**पान ९ पाहा**

**२८ वर्षांचा अध्यापणाचा अनुभव**

**गोवा, कोल्हापूर आणि सोलापूर येथील विद्यापीठांमध्ये सुमारे २८ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव त्यांच्याकडे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित कार्यकारी बुद्धिमत्ता, क्वांटम संगणन, स्नायूरूपी संगणन, यंत्रशिक्षण, विद्युत परिपथ रचना आणि सायबर–भौतिक प्रणाली या विषयांमध्ये त्यांनी संशोधन कार्य केले आहे. त्यांनी २३ हून अधिक अभ्यासक्रम विकसित केले आहेत.**

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी डॉ. कामत

**पान १ वरुन**

**डॉ कामत यांच्या २११ संशोधन पत्रिका आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाल्या असून त्यांची १६ पुस्तके देखील प्रकाशित झाली आहेत. त्यांना अध्यापन, संशोधन तसेच प्रशासन क्षेत्रात व्यापक अनुभव आहे.**

**शैक्षणिक वारसा जपण्यासाठी प्रयत्नशील**

शिवाजी विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण पूर्ण झाले असून याच विद्यापीठात प्राध्यापक म्हणून सेवा बजावण्याची संधी मिळाली होती. आता याच विद्यापीठात कुलगुरूपदी काम करण्याची संधी मिळणे ही भाग्याची गोष्ट आहे. शिवाजी विद्यापीठाने संशोधक म्हणून मला नवी ओळख दिली आहे. विद्यापीठाचा शैक्षणिक, ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी प्रयत्नशील राहीन.

■ **डॉ. राजनीश के. कामत, नूतन कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ.**

**डॉ. कामत यांचा अल्पपरिचय**

शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू डॉ. राजनीश कमलाकर कामत यांचे मूळ गाव कागल (जि. कोल्हापूर) आहे. त्यांचे कुटुंब करवीर संस्थान व कोल्हापूरच्या सामाजिक–शैक्षणिक परंपरेशी निगडित आहे. त्यांचे आजोबा छत्रपती राजाराम महाराजांचे खासगी वैद्य होते. त्यांचे काका डॉ. बाळकृष्ण कामत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्नेही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कागल येथे त्यांच्या घरी मुक्काम केला होता. त्यांचे वडील कोल्हापूर गुन्हे अन्वेषण विभागात उपअधीक्षक पदावर कार्यरत होते. डॉ. कामत यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विज्ञान शाखेत पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. दोन्ही पदव्यांमध्ये त्यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. पुढे त्यांनी गोवा विद्यापीठातून पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगळुरू आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथे उच्च तांत्रिक प्रशिक्षण घेतले.

जनसंपर्क कक्ष
2 2 MAY 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. रजनीश कामत शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्याकडून नियुक्ती जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. रजनीश कामत यांची गुरुवारी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल तथा कुलपती जिष्णू देव वर्मा यांच्या कार्यालयाकडून यासंदर्भात अधिकृत घोषणा करण्यात आली. डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाचे चौदावे कुलगुरू ठरले आहेत. ते सध्या मुंबईतील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून कार्यरत असून, त्यांच्या नियुक्तीमुळे शिवाजी विद्यापीठाला तब्बल नऊ महिन्यांनी पूर्णवेळ कुलगुरू मिळाले आहेत.



राजभवन येथे दि. १४ मे रोजी अंतिम पाच उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, नागपूर विद्यापीठातील डॉ. स्मिता देशमुख आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. संजय ढोले ▶▶ पान ७ वर....

डॉ. रजनीश कामत शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलगुरू

यांचा समावेश होता. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी घेतलेल्या अंतिम मुलाखतींनंतर डॉ. कामत यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. डॉ. रजनीश कामत यांना उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आहे. डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून काम पाहण्यासोबतच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ (लोणेरे), सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाईन (मुंबई) आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ या तीन महत्त्वाच्या विद्यापीठांचे 'प्रभारी कुलगुरू' म्हणूनही यशस्वीपणे कार्यभार सांभाळला आहे. रिलायन्स

2 2 MAY 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. कामत

**जनप्रवास : कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. आर. के. कामत यांची नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल तथा कुलपती जिष्णू देव वर्मा यांच्या कार्यालयाकडून यासंदर्भात घोषणा झाली. कुलगुरुपदासाठी राज्यभवन येथे गुरुवार, १४ मे रोजी मुलाखती झाल्या. कुलगुरुपदासाठी माजी प्रकुलगुरू पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, प्र कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. स्मिता देशमुख आणि डॉ. संजय ढोले यांच्या मुलाखती झाल्या. या मुलाखती प्रक्रियेनंतर कुलपती कार्यालयाकडून शिवाजी विद्यापीठाच्या नवीन कुलगुरुंची नियुक्ती जाहीर केली. त्यानुसार डॉ. कामत हे शिवाजी विद्यापीठाचे चौदावे कुलगुरू ठरले आहेत.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरुपद सुमारे नऊ महिने रिक्त आहे. तत्कालीन कुलगुरु डी. टी. शिर्के यांचा कुलगुरुपदाचा कालावधी सहा ऑक्टोबर २०२५ रोजी संपला. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा अतिरिक्त कार्यभार पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी यांच्याकडे सोपविला होता. कुलगुरू शोध निवड समितीतर्फे कुलगुरुपदासाठी इच्छुकांकडून अर्ज मागविले होते. २३ डिसेंबर २०२५ ते २७ जानेवारी २०२६ या अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत ११५ जणांनी अर्ज दाखल केले. फेब्रुवारी महिन्यात त्या अर्जांची छाननी झाली. त्यातून २८ उमेदवारांची नावे मुलाखतीसाठी जाहीर केली. या उमेदवारांच्या मुलाखती तीन आणि चार एप्रिल रोजी झाल्या होत्या. कुलपती कार्यालयाकडून कुलगुरुपदाच्या अंतिम मुलाखतीसाठी ११ मे रोजी पाच जणांना कळविले होते. त्यानुसार १४ मे रोजी सकाळी मुलाखत प्रक्रिया पार पडली. त्यानंतर गुरुवारी राज्यपालांनी कुलगुरू पदाच्या नावाची घोषणा करताना डॉ. आर. के. कामत यांची कुलगुरूपदी निवड केली आहे.

▶ पान ४ वर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ. कामत

▶ **पान १ वरून** : डॉ. कामत मूळचे कागल येथील आहेत. ते शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे माजी प्रमुख असून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता म्हणूनही त्यांनी काम पाहिलेले आहे. सध्या ते मुंबई येथील डॉ. होमी भाभा समूह विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. गेल्या २५ वर्षांत त्यांनी शिवाजी विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माध्यमातून उच्च शिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्या यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत. त्यात शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन अँड इनक्युबेशन लिन्केजिसचे संचालक, तंत्रज्ञान विभागाचे संचालक, इलेक्ट्रॉनिक्स तसेच संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करिअर कौन्सिलिंग कक्षाचे समन्वयक पदांचा समावेश आहे. आता ज्या विद्यापीठात शिक्षण घेतले, त्याच विद्यापीठात कुलगुरू म्हणून निवड झाली आहे. त्यांच्यावर सर्व क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

> माझे शिक्षण शिवाजी विद्यापीठात झाले. याच विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. या विद्यापीठाने संशोधक म्हणून मला ओळख दिली. प्रशासकीय काम करण्याची संधी यापूर्वी मी घेतली आहे. ज्या विद्यापीठात शिक्षण घेतले, त्याच विद्यापीठात कुलगुरू म्हणून जाणे माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. मी शिवाजी विद्यापीठाचे काहीतरी देणे लागतो, म्हणून नियतीने माझी ही निवड केली आहे. या निवडीबद्दल राज्यपाल आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचे मी मनापासून आभार मानतो.
>
> **- डॉ. आर. के. कामत (नूतन कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)**

2 2 MAY 2026
सकाळ

# म्हणून डॉ. कामत यांची नियुक्ती

कोल्हापूर, ता. २१ : नूतन कुलगुरू डॉ. कामत यांनी यापूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या विविध पदांवर काम केले आहे. विद्यापीठाला नॅकचे ए-प्लस प्लस मानांकन मिळविण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते. संशोधन, शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय कामाचा अनुभव पाठीशी असल्याने त्यांची नियुक्ती झाली. ते शांत, मितभाषी, संयमी असून, सर्वांना बरोबर घेऊन कार्यरत राहणे हे त्यांच्या आतापर्यंतच्या यशस्वी वाटचालीचे गमक आहे. गेल्या २८ वर्षांपासून यांनी शिवाजी विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, होमीभाभा राज्य विद्यापीठाच्या माध्यमातून उच्चशिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स विषयात एम.एस्सी., गोवा विद्यापीठातून पीएच.डी. प्राप्त केली. त्यांच्या २११ संशोधन पत्रिका आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाल्या असून, त्यांची १६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. डॉ. शिर्के यांच्या माध्यमातून कोल्हापूरला पहिल्यांदा कुलगुरू पदाची संधी मिळाली होती. त्यानंतर डॉ. कामत यांच्या रूपाने पुन्हा कोल्हापूरला संधी मिळाली.